महाराष्ट्र जमीन महसूल, अधिकार अभिलेख (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ च्या नियम ३१ नुसार करावयाची कार्यवाही

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक पिक पहाणी-१००१/प्र.क्र.४७०/ल-६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दि.१५.३.२००२

पहा :- १) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र.आरटीएस ४३७८/६०६६/ल-६, दि.२१ मार्च, १९७९

२) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र.एस १४९७/प्र.क्र.५१३/ल-६, दि.२४ नोव्हेंबर, १९९७

३) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र.एस १४९७/प्र.क्र.५१३/ल-६, दि.२१ डिसेंबर, १९९८

परिपत्रक :

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंद वहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ च्या नियम ३० व ३१ मध्ये पीक पे-याबाबतच्या तक्रारी निकाली काढण्याबाबतची जी पध्दती विहित केली आहे ती पाळली जात नाही व वर्षभरात केंव्हाही नमुना नं.१४ भरुन तहसिलदार कार्यालयास पाठविला जातो. नमुना नं.१४ मध्ये नाव नोंदवितांना कागदपत्रांची शहानिशा केली जात नाही किंवा ज्या जमिनीत पीके नाहीत अशा जमिनीत देखील त्रयस्त व्यक्तींची नांवे नोंदविली जातात किंवा तहसिलदार कार्यालयात संबंधित व्यक्तींनी केलेल्या अर्जावरच तहसिलदार कचेरीत नमुना नं.१४ भरुन पाठवावा असा शेरा मारुन तलाठी यांच्याकडून १४ नंबर भरुन घेऊन पीक पाहणी विवाद सुरु करण्यात येतात. वास्तविक वरील दोन्ही बाबी नियमाशी विसंगत आहेत. सदर नियमामध्ये स्पष्ट उल्लेख केल्याप्रमाणे पीके उभी असतील अशाच

वेळी पीक पाहणी करणे गरजेचे आहे. अनावश्यक वेळी व नियमातील तरतुदींच्या विरुध्द नमुना नं.१४ भरुन पीक पहाणी विवाद सुरु करण्यात येत असल्यामुळे महसूली न्यायालयात मोठया प्रमाणावर दावे सुरु होतात व त्यामुळे त्या त्या वर्षी पीक पे-याचा निर्णय होण्याऐवजी अनेक वर्षानंतर मागील पीक पहाणी बाबत निर्णय दिल्याच्या घटना घडतात. त्यामुळे कायद्याचा मुळ उद्देश साध्य होत नाही. या निर्णया विरुध्द उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी, आयुक्त व शासन पातळीपर्यन्त अपीले होतात. त्यामुळे कालापव्यय होतो व शेतक-यांना वेळीच न्याय मिळत नाही. चुकीच्या पध्दतीने नमुना नं.१४ भरल्यामुळे महसूली दाव्यांमध्ये मोठया प्रमाणावर वाढ होते, ही एक गंभीर बाब आहे. नमुना नं.१४ भरतांनाच योग्य ती खबरदारी घेतल्यास व नियम ३० व ३१ मधील कार्यपध्दतीचा अवलंब केल्यास ही बाब टाळता येणे शक्य आहे व त्यामुळे दाव्यांची संख्याही कमी होण्यास मदत होईल.

नियम ३० व ३१ अंतर्गत खालील प्रमाणे कार्यपध्दती विषद केलेली आहे :-

खरीप व रब्बी पीकांची नजर पैसेवारी जाहीर करण्यापूर्वी त्या हंगामातील पीकांची पीक पहाणी पूर्ण करणे गरजेचे असते. नियम ३० प्रमाणे पीक पहाणीसाठी तलाठी यांनी गावी दवंडीने कार्यक्रम प्रसिध्द करुन पीक पे-यासंबंधी माहिती देण्याकरिता नियोजित कार्यक्रमाच्या किमान ७ दिवस अगोदर शेतक-यांना त्यांच्या शेतामध्ये हजर राहण्याच्या सूचना देणे अपेक्षित आहे. गावी प्रत्यक्ष भेट देऊन गावकरी, ग्राम पंचायत सदस्य आणि सरपंच यांच्या उपस्थितीत नमुना नं.१२ मध्ये माहिती तलाठयांनी भरली पाहिजे. तलाठी यांनी तयार केलेली माहिती बरोबर असल्याबाबत खात्री करण्यासाठी मंडळ अधिकारी यांनी वरील प्रमाणेच गावक-यांना सूचना देऊन आवश्यक त्या दुरुस्त्या नियम ३० (४) प्रमाणे करणे आवश्यक आहे. कब्जेदारांव्यतिरिक्त अन्य व्यक्ती वहिती करीत असल्यास त्याबद्दल नमुना नं.१४ मधील माहिती भरुन तलाठयांनी तहसिलदारांनी पाठविणे आवश्यक आहे. अशी माहिती पीक पाहणी केल्यापासून लवकरात लवकर पाठविणे नियम ३१ (१) नुसार तलाठयांवर बंधनकारक आहे. नमुना नं.१४ मध्ये माहिती प्राप्त झाल्यानंतर लवकरात लवकर चौकशी अधिका-यांनी संबंधित व्यक्ती, तलाठी व सरपंच यांना चौकशीच्या तारखेपूर्वी किमान ७ दिवस अगोदर नोटीस देऊन गावी भेट देऊन निर्णय देण्याबद्दल नियम ३१ (२) मध्ये कार्यप्रणाली ठरवून दिलेली आहे. तथापि, या कार्यप्रणाली प्रमाणे कोणत्याही स्तरावर कामकाज केले जात नाही असे आढळून येते.

वरील तरतुदींचा साकल्याने विचार करता अशा सूचना देण्यात येत आहेत की, प्रत्यक्ष पीक पहाणी करते वेळीच फक्त नमुना नं.१४ भरण्यांत यावा. वर्षाच्या इतर वेळी तलाठयांनी अशी नोंद करु नये. तसेच, तहसिल कार्यालयात परस्पर केलेल्या अर्जाबाबत दखल घेतली जाऊ नये. त्या त्या वर्षाच्या पीक पे-याविरुध्द त्याच वर्षी निकाल होणे आवश्यक आहे. तसेच तलाठी दप्तर तपासतांना नियमांचे पालन केले आहे किंवा नाही याबाबतची खातरजमा उपविभागीय अधिकारी यांनी व संबंधित इतर अधिकारी यांनी करावी. वरील सूचनांचे पालन काटेकोरपणे केले जाईल याबाबत दक्षता सर्व जिल्हाधिका-यांनी ध्यावी.

( विकास देशमुख )
उपसचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी,

सर्व उपविभागीय अधिकारी/सर्व तहसिलदार,/सर्व मंडळ अधिकारी

मा.मंत्री (महसूल)/मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव,

मंत्रालयातील सर्व विभाग,

महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने

कार्यासन ल-६, महसूल व वन विभाग (निवड नस्ती)

— x —

एच-७७२८ (१२००-३-०२)-२